**नगरविकास विभाग**

४था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ सप्टेंबर २०१५

**अधिसूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्रमांक टीपीएस. १७१४/१९७/प्र.क्र.२४/१५/नवि-१२.—ज्याअर्थी, नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्राकरिता (नैना) शहर आणि औद्योगिक विकास महामंडळाची (सिडको) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे जिचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे.) चे कलम ४०(१) अनुसार अधिसूचना क्रमांक टीपीएस. १७१२/४७५/९८/१२/नवि-१२, दिनांक १० जानेवारी २०१३ अन्वये विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक झालेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या परिशिष्ट दोन मधील भाग एक मध्ये विकास शुल्क आकारणीबाबत तरतूद नमूद केलेली आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त तरतूद " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, सिडको प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम १२४बी(३)(अे) अनुसार कार्यवाही करून विकास शुल्क आकारणीमधील दरांच्या वाढीबाबत फेरबदल प्रस्ताव दिनांक ९ ऑक्टोबर २०१३ च्या पत्रान्वये मंजुरीसाठी शासनास सादर केला (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त वाढ प्रस्ताव " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, वर नमूद बाबी विचारात घेता, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर सिडको प्राधिकरणाने सादर केलेला उक्त वाढ प्रस्ताव काही बदलासह मंजूर करण्यात यावा, असे शासनाचे मत झाले आहे.

आणि त्याअर्थी, उक्त अधिनियमातील कलम १२४बी(३)(बी) अन्वये शासनास प्राप्त असलेल्या शक्तीचा वापर करून खालील सूचीमध्ये नमूद केल्यानुसार विकास शुल्क आकारणीला सुधारीत मंजुरी देण्यात येत आहे.

**अनुसूची**

**विकास शुल्क आकारणीबाबत सुधारीत दर**

| | | |
|---|---|---|
| For Development proposals in the notified area for NAINA | (*a*) for land Development. - | 0.5 percent of the rates of Annual Statement of Rates per Sq. mtr. or Rs. 100/-per Sq.mtr. Whichever is more. |
| | (*b*) for construction. - | 2.00 percent of the rates of Annual Statement of Rates per Sq. mtr. Or Rs. 400/-per Sq. mtr. Whichever is more. |

२. सदरचा मंजूर फेरबदल ही अधिसूचना **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

३. उक्त मंजूर फेरबदल नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खाली नमूद कार्यालयामध्ये एक महिन्याच्या कालावधीकरिता उपलब्ध राहील.

(१) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, नवी मुंबई.

(२) सहसंचालक नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

(३) सहायक संचालक, नगररचना, रायगड शाखा, अलिबाग, जिल्हा रायगड.

४. सदर फेरबदलाची अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in.*वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सुनिल फाटक,**
कार्यासन अधिकारी.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032,

dated the 7th September 2015

*NOTIFICATION*

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. TPS. 1714/197/CR-24/15/UD-12.—Whereas, City and Industrial Development Corporation (CIDCO) has been appointed as Special Planning Authority for the Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) by the Government in the Urban Development Department, under section 40(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, (hereinafter referred to as " the said Act ") *vide* Notification No. TPS. 1712/475/CR-98/12/UD-12, dated the 10th January 2013 ;

And whereas, the manner of levying the development charges and collecting by the Authority is mentioned in Part I of Second Schedule of the said Act (hereinafter referred to as " the said provision ") ;

And whereas, CIDCO completed the procedure as per section 124(B)(*3*)(*a*) of the said Act and submitted the modification proposal to the Government for enhancing the rates of the said provision for NAINA (hereinafter referred to as " the proposed Modification ") ;

And whereas, after considering the above facts and making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that the proposed modification should be sanctioned with certain changes ;

Now therefore, in exercise of the powers conferred under section 124(B)(*3*)(*b*) of the said Act, the State Government approves the enhancement of rate and sanctions the proposed modification as mentioned in schedule attached herein below :—

*Schedule*

Revised Rate at which development charge to be levied

| | | |
|---|---|---|
| For Development proposals in the notified area for NAINA | (*a*) for land Development. - | 0.5 percent of the rates of Annual Statement of Rates per Sq. mtr. or Rs. 100/-per Sq.mtr. Whichever is more. |
| | (*b*) for construction. - | 2.00 percent of the rates of Annual Statement of Rates per Sq. mtr. Or Rs. 400/-per Sq. mtr. Whichever is more. |

2. Fixes the date of publication of this notification in the *Government Gazette* as the date of coming into force of this notification.

3. This notification shall be made available for inspection by the general public during office hours on all working days at the following offices for a period of one month :—

(*i*) The Managing Director, CIDCO, CIDCO Bhavan, Navi Mumbai. 400 614.

(*ii*) The Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

(*iii*) The Assistant Director of Town Planning, Raigad-Alibag Branch, Alibag.

4. This notification shall also be published on the Government Website at *www.maharashtra.gov.in.*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SUNIL PHATAK,
Section Officer.